पुण्य नगरी
सोमवार, ७ नोव्हेंबर २०१६

# सेलूत आजपासून बेसबॉल, सॉफ्टबॉल स्पर्धा

सेलू / प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व नूतन महाविद्यालय सेलू यांच्या वतीने ७ ते ९ नोव्हेंबर दरम्यान आंतरमहाविद्यालयीन बेसबॉल व सॉफ्टबॉल स्पर्धा घेण्यात येत असून उद्घाटन सोमवार ७ नोव्हेंबर रोजी येथील नूतन महाविद्यालयाच्या क्रीडागंणावर संपन्न होणार आहे.

या स्पर्धा नांदेड विद्यापीठ अंतर्गत , नांदेड, हिंगोली, लातूर, परभणी या जिल्ह्यात तील मुलांचे संघ सहभागी होणार आहेत. या सर्व स्पर्धा बाद पध्दतीने खेळविणारे जाणार आहेत. या स्पर्धेतून विद्यापीठाचा संघ निवडला जाणार आहे. यासाठी सुसज्ज दोन मैदान तयार करण्यात आली आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी डॉ.शरद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.के.के.कदम, प्रा.नागेश कान्हेकर, डी. डी.सोन्नेकर, गणेश माळवे, संतोष शिंदे, प्राध्यापक व कर्मचारी प्रयत्नशिल आहेत.